



**About Us:** http://www.galaxyimrj.com/about-us/
**Archive:** http://www.galaxyimrj.com/archive/
**Contact Us:** http://www.galaxyimrj.com/contact-us/
**Editorial Board:** http://www.galaxyimrj.com/editorial-board/
**Submission:** http://www.galaxyimrj.com/submission/
**FAQ:** http://www.galaxyimrj.com/faq/

# महाराष्ट्रातील पारधी जमात व तिचे पोट प्रकार

**डॉ. आण्णासाहेब हंबीराव सोनवणे**
(पोस्ट डॉक्टरेट)
मराठी भाषा व वाङ्मय विभाग,
डॉ. बा. आं. म. विद्यापीठ,
छ. संभाजीनगर

**प्रस्तावना :-**

महाराष्ट्रात अनेक आदिवासी,भटक्या विमुक्त जाती आणि जमाती मोठ्या प्रमाणात आढळतात. त्यापैकी पारधी ही एक भटकी जमात आहे. 'पारध' या संस्कृत शब्दापासून पारधी या मराठी जमात दर्शक शब्दाची निर्मिती झाली. पारध या शब्दाचा मराठी अर्थ 'शिकार' असा आहे. जो पारध म्हणजेच शिकार करतो तो पारधी. १८७१ च्या कायद्याने अनेक जमातींना गुन्हेगार जमाती म्हणून चिकामोर्तब केले होते. त्यात पारधी या जमातीचा समावेश होता. गुन्हेगारी जमात म्हणून शिक्का मारल्यामुळे पारधी जमातीचे लोक एका गावी कधीच स्थिर जीवन जगू शकले नाहीत. अस्थिर जीवन जगणाऱ्या पारधी जमातीला या "खंडप्राय देशांमध्ये त्यांना माझं म्हणून सांगावं असं घर नाही, गावशिवार नाही, पोटासाठी विश्व कवटाळलं पण भूमिपुत्राला भूमीवर आधार नाही"[१] असे आधारही आणि पाठीवर पोट घेऊन परपोषी जीवन जगणारी ही जमात महाराष्ट्रातील अकोला, अमरावती, बुलढाणा, जळगाव, यवतमाळ, धाराशिव (धाराशिव), पुणे आणि सोलापूर या जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात तर काही जिल्ह्यात तुरळक आणि विखुरलेल्या स्वरूपात आढळते.

पारधी जमात वेगवेगळ्या प्रदेशात वेगवेगळे नावाने ओळखली जाते. महाराष्ट्रात ही जमात फासेपारधी आणि पालपारधी या नावाने ओळखली जाते. तर कर्नाटकातील विजापूर जिल्ह्यात 'आवटी संचार' या नावाने ओळखतात. आंध्र प्रदेशात पारधी जमातीला पट्टा लोलू किंवा फांस पारधी किंवा निरशिकारी म्हणतात. मध्य प्रदेशात पारधी बहेलिया, मीर शिकार, मोघिया, शिकारी, टाकणकार इत्यादी नावाने ओळखले जाते. ज्याप्रमाणे पारधी जमातीला प्रदेशपरत्वे वेगवेगळी नावे आहेत, तद्वतच पारधी जमातीमध्ये अनेक भिन्न पोट जमाती आहेत ."पारधी ही

एक जमात नाही, त्या जमातीत काही पोट जमाती किंवा पोट जाती आहेत. त्यांच्या शिकार करण्याच्या प्रकारावरून आणि राहण्यासाठी निवडलेल्या निवाऱ्यावरून त्यांना वेगवेगळ्या नावाने ओळखले जाते."[२] तसेच त्यांचे पेहराव, खानपान आणि रोटी- बेटी व्यवहार यावरूनही त्यांच्या पोट जमाती निर्माण झालेल्या दिसतात.

**पोट जमाती / उप जमाती :-**

महाराष्ट्रातील पारध्यांमध्ये पवार, काळे शिंदे, चव्हाण, दाभाडे, सोनोने आणि सूर्यवंशी इत्यादी आडनावे आढळतात, हीच त्यांची कुळे आहेत. पारधी आंतर्विवाही आहेत. पण सगोत्र विवाह त्यांच्यात केला जात नाही. स्पर्धांमध्ये श्रेष्ठ-कनिष्ठता जोपासली जाते. प्रत्येक पोट जमातीचा विशिष्ट एक दर्जा ठरलेला असून त्यांच्यात रोटी-बेटी व्यवहार, रूढी-परंपरा इत्यादीचे अलिखित नियम आहेत. रसेल आणि हिरालाल यांच्या मते, पारध्यांमध्ये अंतर्विवाह संबंध करणारे बरेच गट आहेत. त्यापैकी प्रमुख उपजाती शिकार करणाऱ्या पारध्यांच्या असून ते तीक्ष्ण शस्त्रे वापरतात. त्या उपजमाती पुढील प्रमाणे आहेत.

१. **फासेपारधी :-**

फासे पारध्यांना विजापूर जिल्ह्यात 'आवटी संचार' म्हणून ओळखले जाते. फासा हे एक शिकार करण्याचे साधन आहे. वेगवेगळ्या फाशांच्या साह्याने ससे, तितर, पारवा, व्हला, हरीण इत्यादी पशु पक्ष्यांची शिकार करून उदरनिर्वाह करणाऱ्यांना फासेपारधी असे म्हणतात. महाराष्ट्रातील ग्रामीण भागात फासे पारधी ही पारध्यांमधील पोट जमात मोठ्या प्रमाणात आढळते. तीही विखुरलेल्या स्वरूपात.

२. **गाय पारधी :-**

गाय पारधी गाई पाळतात. तसेच ते भटकंती करण्यासाठी गायीचा वापर करतात. गाईच्या अडून ते पशु-पक्ष्यांची शिकार करतात. म्हणून त्यांना गाय पारधी असे म्हणतात. ते

ससे, तरस, पारवा, व्हला यांची शिकार करतात. गायी पारधी स्वतःची ओळख राज पारधी म्हणून करून देतात.

३. **वाघरी पारधी :-**

'वागुर' म्हणजे पक्षांची शिकार करण्यासाठी वापरायचे एक विशिष्ट जाळे होय. या वाघरीच्या मदतीने ते पशु-पक्षांची शिकार करतात म्हणून त्यांना वाघरी पारधी म्हणतात. पारध्यांच्या उप जमातींपैकी ही एक महाराष्ट्रातील प्रमुख उप जमात आहे.

४. **हरण पारधी :-**

या उप जमातीतील लोक हरणाची शिकार करून आपले उदरभरण करतात. म्हणून त्यांना हरण पारधी असे म्हणतात. ही जमात जंगल वनात शिकारीसाठी सतत भटकंती करते. शासनाने केलेल्या जंगल संरक्षण कायद्यामुळे या जमातीच्या उदरनिर्वाहाचे प्रश्न निर्माण झाले. वन्य प्राण्यांची शिकार करणे कायद्याने गुन्हा ठरवू लागले. परिणामी हरण पारधींच्या पोटाचे वांदे झाले. या उप जमातीला काही भागात 'चिगर बेटकर' म्हणूनही ओळखतात.

५. **चित्ता पारधी :-**

चित्ता नावाच्या प्राण्यांची शिकार करणारा तो चित्ता पारधी. फार पूर्वी ही उप जमात लहान-लहान वाघ (चित्ते) पकडून ते राजांना विकत असत किंवा गाड्यांवर घालून गावोगावी भटकंती करत असतात. म्हणून त्यांना चित्तेवाले पारधी असे म्हणतात.

६. **टकारी / टाकणकर :-**

टाकीच्या साह्याने दगड घडवणारी ही एक उप जमात होय. ती दळणाच्या जात्याला टाकी लावण्याची काम करत असत म्हणून त्यांना टकारी किंवा टाकणकर असे म्हणतात.

७. **गाव पारधी :-**

गाव-गाड्यांच्या अवती-भोवती आश्रय करून जे राहतात,त्यांना गाव पारधी असे म्हणतात. या उप जमातीतील लोकांना गाय पारधी आणि फासेपारधी हलक्या दर्जाचे समजतात.

ते त्यांच्याबरोबर रोटी-बेटी व्यवहार करीत नाहीत. ब्रिटिशांच्या काळात गुन्हेगारी जमाती कायद्यांतर्गत ज्या पारध्यांना बंदिस्त केले होते ते आज त्याच ठिकाणी स्थिरावलेले आहेत. गाव-शहराजवळ ज्यांनी आपली वस्ती कायम केलेली आहे किंवा आज जे गाव-खेड्याशी सलोख्याने राहतात त्यांना गाव पारधी म्हणून ओळखले जाते.

८. **राज पारधी :-**

पारध्यांमधील इतर पोट जमातींपेक्षा ही जमात स्वतःला श्रेष्ठ समजते. इतर पोट जमातींबरोबर ही जमात रोटी-बेटी व्यवहार करत नाही. गाय पारधी जमातीतील लोक स्वतःची ओळख राज पारधी म्हणून करून देतात. राजपारधी ही पोट जमात मराठवाडा, विदर्भ, खानदेशाबरोबर पश्चिम महाराष्ट्रात ही आढळते.

९. **भिल्ल पारधी :-**

जंगलाच्या आश्रयाने राहणाऱ्या या जमातीचा प्रमुख व्यवसाय शिकार करणे हाच आहे. भिल्ल पारधी हे चोरी करण्यात अत्यंत पारंगत असतात. आदिवासी भिल्ल जमातीप्रमाणे भिल्ल पारधी वनौषधी गोळा करतात. भिल्लपारध्यांना 'धनगर पारधी' म्हणूनही ओळखले जाते.

१०. **लंगोट पारधी :-**

या पोट जमातीमधील पारधी कमरेला फक्त लंगोट वापरतात, म्हणून त्यांना लंगोट पारधी असे म्हणतात. ते अर्धनग्न असतात. केस कधीही विंचरीत अथवा कापीत नाहीत. या पोट जमातीतील बायका घागरा अथवा चोळी-लुगडे नेसतात. त्यांच्या हातात पितळ किंवा कथिल धातूंच्या बांगड्या असतात. त्यांच्या कानात बाळ्या आणि पायात साखळ्या असतात. स्त्री आणि पुरुष दोघेही रंगीबेरंगी मण्यांच्या माळा घालतात. त्यांच्या वेशभूषेवरून लंगोट पारधी अशी त्यांची ओळख निर्माण झालेली आहे.

११. **पाल पारधी :-**

एखाद्या गावाच्या बाजूला पाल ठोकून ही जमात राहते, म्हणून त्यांना पाल पारधी असे म्हणतात. ही जमात एका ठिकाणी दीर्घ काळ राहत नाही. उदर भरण्यासाठी ही जमात सतत एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी फिरत राहते.

१२. **जंगल पारधी :-**

ही पोट जमात उदर भरण्यासाठी जंगलाच्या आश्रयाने वास्तव्य करते, म्हणून त्यांना जंगल पारधी असे म्हणतात. जंगलात फिरणाऱ्या या पोट जमातीला विजापूर भागात 'आवटी संचार' असे म्हणतात. 'आवटी' म्हणजे 'जंगल' आणि 'संचार' म्हणजे 'फिरणे'. म्हणून आवटी संचार.

१३. **गोसावी पारधी :-**

ही जमात गोसाव्याप्रमाणे भगवी वस्त्र परिधान करून भिक्षा मागते, म्हणून त्यांना गोसावी पारधी असे म्हणतात.

१४. **बंदरवाले पारधी :-**

या पोट जमातीतील लोक गावोगावी फिरून माकडाचे खेळ दाखवतात व त्यावर उदरनिर्वाह करतात, म्हणून त्यांना बंदरवाले पारधी असे म्हणतात.

१५. **शिशी के तेलवाले पारधी :-**

या उप जमातीतील लोक सुसरीचे तेल काढतात आणि ते औषध म्हणून विकतात म्हणून त्यांना शिशी के तेल वाली पारधी असे म्हणतात.

**समारोप:-**

पारधी ही एक जमात आहे. परंतु त्यांच्या व्यवसायावरून, राहण्याच्या ठिकाणावरून आणि त्यांच्या वेशभूषेवरून या सर्व पोट जमाती पडलेले आहेत, असे आपणाला दिसते. प्रत्येक पोट जमातीचे एक विशिष्ट वेगळेपण आहे. प्रत्येक पोट जमातीचे आचार-विचार, सण-उत्सव धार्मिक आणि सांस्कृतिक जीवन भिन्न आहे. पारधी हे अंतर्विवाही आहेत. परंतु त्यांच्यात सगोत्र विवाह केले जात नाहीत. पारध्यांमध्ये श्रेष्ठ कनिष्ठता जोपासली जाते. रूढी परंपरा इत्यादी ही जोपासली जाते. त्यांच्यात सांस्कृतिक आणि धार्मिक अंतर्विरोध आहेत. प्रत्येक पोट जमातीचे आचार,विचार सण-उत्सव, धार्मिक आणि संस्कृतीक जीवन हे भिन्न असल्याचे आपणाला दिसते. या जमाती देशाच्या वेगवेगळ्या राज्यात वेगवेगळ्या नावाने ओळखल्या जातात.

**निष्कर्ष :-**

१. पारधी जमातीतील पोट जमाती या त्यांच्या व्यवसाय, पेहराव आणि निवासाच्या प्रकारावरून पडलेल्या आहेत.
२. पारधी पोट जमातींमध्ये श्रेष्ठ-कनिष्ठता जोपासली जाते.
३. पारधी पोट जमातीमध्ये सगोत्र विवाह केले जात नाहीत.
४. पारध्यांमधील प्रत्येक पोट जमातीचे आचार-विचार हे भिन्न स्वरूपाचे आहेत.
५. पारध्यांमधील प्रत्येक पोट जमातींचे धार्मिक आणि सांस्कृतिक जीवन हे भिन्न आहे.

**संदर्भ:-**

१. नागनाथ धों कदम- महाराष्ट्रातील भटका समाज : संस्कृती व साहित्य, प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्र. आ. १९९५, पृ. क्र. ७
२. रामनाथ चव्हाण - भटक्या मुक्तांची जातपंचायत, देशमुख आणि कंपनी पब्लिशर्स प्रा. लि., पुणे, द्वि. आ. २०१६, पृ. क्र. २२१
३. रामनाथ चव्हाण - जाती आणि जमाती, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, १९८९

४. लक्ष्मण माने - विमुक्तायन- महाराष्ट्रातील विमुक्त जमाती, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई प्र. आ. १९९७